Exh.01

**अहमदनगर येथील मे.चिफ ज्युडीशिअल मॅजिस्ट्रेट साहेब अहमदनगर**

**यांचे कोर्टात....**

**एस. सी. सी. नं.** 7046 **/2025**

**फिर्यादी**

**ज्योती क्रांती को.ऑप क्रेडीट सोसायटी लि**. जवळा तर्फे व करीता अधिकृत प्रतिनिधी
**नागेश शिवाजी सराटे,**
वयः 27 वर्षे, धंदा नोकरी,
रा.अहमदनगर
मो.नं.9309566922

**आरोपी**

**वनीता किशोर कांबळे**
वय 46 वर्षे, धंदा – नोकरी
रा. गजानन सोसायटी, दौंड, ता.दौंड, जि.पुणे
मो.नं. 7887964223

**फिर्याद – निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टचे कलम 138 प्रमाणे**

**याकामी फिर्यादी नम्रपुर्वक कळवितात ते खालीलप्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| 1 | चेक देणाराचे नांव | वनीता किशोर कांबळे |
| 2 | चेक कोणत्या बँकेचा | कोटक महिंद्रा बँक, शाखा बारामती |
| 3 | चेक नंबर, तारीख व रुपये | चेक नं.000001, दि.19/04/2025, रु.22,356/- |
| 4 | फिर्यादीच्या बँकेचे नाव | येस बँक लि. शाखा अ.नगर |
| 5 | चेक भरल्याची तारीख | 24/04/2025 |
| 6 | चेक न वटता परत आल्याची तारीख | 25/04/2025 |

| | | |
|---|---|---|
| 7 | चेक परत आल्याचे कारण | Drawers signature differs |
| 8 | नोटीस पाठविल्याची तारीख | 07/05/2025 |
| 9 | नोटीस स्विकारली / इंटीमेशन मिळाली तारीख | 15/05/2025 (पाकीट परत) |
| 10 | गुन्हा घडले कारण | दि.25/04/2025 रोजी चेक न वटता परत आला त्यावेळी घडले. तदनंतर वकीलांमार्फत नोटीस पाठविली असता आरोपीने नोटीस जाणुन बुजुन स्विकारली नाही व नोटीसची इंटिमेशन मिळूनही मुदतीत चेकची रक्कम आणुन दिली नाही त्यावेळी घडले. |
| 11 | कोणत्या पोलीस स्टेशन हद्दीत गुन्हा घडला | तोफखाना पोलीस स्टेशन अ.नगर |

1) फिर्यादी ज्योती क्रांती को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. अहमदनगर ही संस्था सहकारी कायद्याप्रमाणे रजिस्टर झालेली असून तिचे मुख्य कार्यालय जवळा, ता. जामखेड, जि. अहमदनगर येथे असून मार्केट यार्ड, अहमदनगर येथे कॉर्पोरेट कार्यालय व शाखा आहे. फिर्यादी संस्थेचा कारभार कायद्यानुसार तसेच फिर्यादी संस्थेचे पोटनियमानुसार चालतो. फिर्यादी संस्थेच्या वतीने फिर्यादी दाखल करणे, त्यावर सहया करणे, जबाब देणे, व्हेरिफिकेशन करणे, ॲफिडेव्हीट देणे व त्या संदर्भातील सर्व ती कायदेशीर कामे करणे याबाबत फिर्यादी संस्थेचे मा. संचालक मंडळाने ठराव करून नागेश शिवाजी सराटे यांना अधिकार दिलेले आहेत. तसा ठराव असुन त्याची प्रत सोबत दाखल केलेली आहे व त्या अधिकारात फिर्यादी संस्थेकरीता सदरची फिर्याद आणलेली आहे.

2) फिर्यादी संस्थेच्या वतीने तिचे सभासदांना तसेच नाममात्र सभासदांना उद्योग धंद्यासाठी, घरबांधकामासाठी, वाहन खरेदी, घरगुती कारणांसाठी तसेच इतर कारणांसाठी कर्ज पुरवठा केला जातो. तसेच ठेवी गोळा करून बँकींगचा सर्व प्रकारचा व्यवसाय केला जातो. आरोपी यांनी फिर्यादी संस्थेच्या दौंड शाखेकडून व्यवसायाकरीता कर्जाऊ रक्कम मिळावी म्हणून कर्जाची मागणी केलेली होती. त्यानुसार आरोपीची कर्जाची मागणी मंजुर

करून आरोपीस रक्कम रुपये 30,000/- चे कर्ज मंजुर करुन कर्ज प्रकरणातील अटी व शर्तीवर ता.22/12/2023 रोजी कर्जाची रक्कम अदा करण्यात आलेली आहे. सदर कर्जाची फेड आरोपीने त्यावरील होणा-या व्याजासहीत ठरावीक मुदतीत करण्याचे मान्य व कबुल केलेले होते. मात्र आरोपीने कबुल केल्या प्रमाणे सदर रकमेची फेड न करता कर्जाची बाकी थकविलेली आहे. अनेकवेळा मागणी करुनही रक्कम देवू दिलावू करुन दिली नाही व रक्कम देण्याचे कामी टाळाटाळ केलेली आहे.

3) शेवटी आरोपीस थकबाकी रकमेची मागणी करता आरोपीने फिर्यादी संस्थेच्या कार्यालयात येवून आरोपीने त्याचे खाते असलेले **कोटक महिंद्रा बँक शाखा बारामती** या बँकेचा **चेक नं.000001 रक्कम रुपये 22,356/- चा ता.19/04/2025** रोजीचा चेक फिर्यादी संस्थेस दिला व सदरचा चेक खात्यात भरल्यानंतर निश्चित वटेल असा खात्री व भरवसा दिलेवरुन, आरोपीचे शब्दावर विश्वास ठेवून सदरचा चेक स्विकारला. सदरचा चेक फिर्यादी यांनी त्याचे खाते असलेल्या येस बँक लि. अहमदनगर या बँकेत **ता.24/04/2025** रोजी भरला असता सदरचा चेक आरोपीचे बँकेने **"Drawers signature differs"** असा शेरा मारुन **ता.25/04/2025** रोजी परत पाठविला व तशी इंटीमिशन फिर्यादीस त्यांचे बँकेने देवून, त्यासोबत सदरचा चेक न वटता मेमो सहीत परत केलेला आहे.

4) सदरचा चेक न वटता परत आल्यानंतर फिर्यादीने माहितगार वकिलांमार्फत रजि. पोस्टाने **ता.07/05/2025** रोजी आरोपीस नोटीस पाठवून चेक डिसऑनर झाल्याबाबत कळविले व चेकच्या रकमेची मागणी केली असता आरोपीने सदरची नोटीस जाणून बुजुन स्विकारली नाही व सदर पाकीट घेण्यास नकार दिला व सदरचे पाकीट **दि.15/05/2025 रोजीचे "Unclaimed"** अशा शेऱ्यासह परत आले. वास्तविक पाहता आरोपी त्याच पत्त्यावर राहत असुन आरोपीस नोटीसीची माहिती होवून देखील फिर्यादी यांना मुदतीत चेकची रक्कम आणून दिली नाही.

5) अशाप्रकारे आरोपीने दिलेला चेक वटणार नाही याची माहिती व कल्पना आरोपीस असतांना देखील आरोपीने जाणीवपुर्वक सदरचा खोटा चेक देवून

फिर्यादीची फसवणूक केलेली आहे व निगोशिएबल इन्स्ट्रमेंट ॲक्टचे कलम १३८ नुसार गंभीर स्वरुपाचा फौजदारी गुन्हा केलेला आहे म्हणून फिर्यादीची आरोपी विरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रमेंट ॲक्टचे कलम १३८ नुसार सदरची फिर्याद आहे.

**तरी फिर्यादीची विनंती की,**

आरोपीस जास्तीत जास्त कडक शासन तसेच दंड करण्यात यावा व दंडाच्या रकमेतून फिर्यादीस चेकची रक्कम अदा करण्याचा आदेश व्हावा, ही विनंती

**याकामी फिर्यादी तर्फे तुर्त साक्षीपुरावा खालील प्रमाणे**

१. मा. शाखाधिकारी, कोटक महिंद्रा बँक शाखा बारामती साक्षीस माहितगार इसमास हजर ठेवणे व येताना आरोपीचे खात्याबाबत तसेच आरोपीने फिर्यादीस दिलेला वरील चेक फिर्यादीने त्यांचे खात्यात भरला असता तो न वटता परत आला त्या संदर्भातील सर्व माहिती व कागदपत्र घेवून साक्षीस हजर रहावे.

२. मा. शाखाधिकारी, येस बँक लि. अहमदनगर साक्षीस माहितगार इसमास हजर ठेवणे व येताना आरोपीने फिर्यादीस दिलेला वरील चेक फिर्यादीने त्यांचे खात्यात भरला असता तो न वटता परत आला त्या संदर्भातील सर्व माहिती व कागदपत्र घेवून साक्षीस हजर रहावे.

येणे प्रमाणे फिर्यादी तर्फे तुर्त साक्षीपुरावा असे. जादा पुरावा लागल्यास तो देण्याची फिर्यादी यांना परवानगी असावी. येणेप्रमाणे फिर्यादी यांची फिर्याद असे.

अहमदनगर

दिनांक :- 20/6/2025 फिर्यादी ॲडव्होकेट

**S.C.C.No. 7046/2025**

**Jyoti Kranti Co.Operative Credit Society Ltd., Jawala**
**Vs.**
**Vanita Kishor Kamble**

**ORDER BELOW EXH.1**

Perused complaint. Perused verification and documents annexed with the complaint. Heard Learned Advocate for the complainant. Accused is resident of place which is outside of jurisdiction of this Court, hence, held inquiry under Section 225 of the Bhartiya Nagarik Suraksha Sanhita, 2023. The affidavit of authorized officer for the complainant is on record. Contents therein suffice the purpose of inquiry held under Section 225 of Bhartiya Nagarik Suraksha Sanhita, 2023. No further inquiry in this regard for issuance of process is necessary. Upon perusal of aforesaid documents, it appears that offence punishable under Section 138 of The Negotiable Instruments Act, 1881 has been prima facie made out by the complainant against the accused. Hence, issue process against the accused for the offence punishable under Section 138 of The Negotiable Instruments Act, 1881.

**In addition, service of summons by R.P.A.D. is allowed.**

SACHIN RAJARAM SHINDE

Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.09.23 12:17:12 +0530

Ahmednagar
Date : 23.09.2025

**(S. R. Shinde)**
Addl. Chief Judicial Magistrate,
(Court No.18), Ahmednagar